| | |
|---|---|
| **इतर किरकोळ फौ. अर्ज क्र.३९/२०२६ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश.**<br>(दिलिप दत्तात्रय शेलार वि. महाराष्ट्र सरकार) | **MHAH150002832026** |

अर्जदार याने सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३(१) अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार याच्या मालकीचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर व जुनी ट्रॉली लाल रंगाचा असुन त्याचा आर.टी.ओ. पासिंग नंबर MH-17-AV-9184 चेसीज नंबर NKTB11380 व इंजिन नंबर NKTB11380 हा नेवासा पोलिस स्टेशन यांनी गुन्हा क्र.I ६२३/२०२५ चे तपासाकामी जप्त केलेली आहे. सदर वाहन जप्त असल्यामुळे अर्जदारास त्याचे दैनंदिन कामाकरिता अडचण निर्माण होत आहे. सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात न मिळाल्यास त्याचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. सदर वाहन हे पोलिस स्टेशनला पडून राहिल्यास त्याचे ऑईल बॅटरी, टायर, ट्युब खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याने सदर वाहन हे सुपुर्दनाम्यावर देण्यास विनंती केली.

३. तपासी अधिकारी यांना पुरेशी संधी देवुही म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे म्हणणे नाही असा आदेश निशाणी १ वर दि. १७/०३/२०२६ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. तद्नंतर आजपावेतो देखिल तपासी अधिकारी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

४. विद्वान सहायक सरकारी वकील यांनी नि. ८ वर म्हणणे दिले की, सदर वाहन हे भा. न्या.सं. ३०३(२), ३(५) या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला आहे. अर्जदाराने सदर वाहन नोटरी दस्तावर खरेदी केलेले आहे. परंतु, मुळ दस्त अभिलेखावर दाखल नाही.

आर.सी.बुक ची मुळ प्रत अभिलेखावर दाखल नाही. मा. तहसिलदार यांनी अद्याप कारवाई केलेली दिसुन येत नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. सरकारतर्फे विद्वान सहायक सरकारी वकील व अर्जदारातर्फे त्याचे विद्वान वकील श्री. एन.व्ही.नांगरे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले. अर्जदाराने त्याचे अर्जातील कथनाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र व निशाणी ३ सोबत खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

१) गाडी खरेदी नोटरी दस्ताची प्रमाणित प्रत

२) वाहनाचे आर.सी.बुक ची छायांकित प्रतिज्ञापत्र

३) वाहनाचा तपशील

४) गाडीची पावती

५) मुळ मालक बापुसाहेब दत्तात्रय शेलार यांचे प्रतिज्ञापत्र

६) अर्जदाराचे आर.सी.बुक नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

इत्यादी प्रति अभिलेखावर सादर केलेली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रतीवरुन सदर प्रकरणातील मुद्देमालातील वाहन हे प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे बापुसाहेब दत्तात्रय शेलार यांच्या नावाने नोंदणीकृत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच नोटरी करारनाम्यावरून सदर वाहन अर्जदार याने बापुसाहेब दत्तात्रय शेलार याचेकडुन खरेदी केले असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हा सदर वाहनाचा मालक व कब्जेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

६. चौकशी अधिका–याच्या अहवालावरुन सदर वाहन हे नेवासा पोलिस स्टेशन

येथे गुन्हा क्र.I–६२३/२०२५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५, ३ बी.एन.एस, २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे जप्त असल्याचे दिसून येते. तसेच सदर वाहनावर अदयापपावेतो कोणीही हक्क सांगितलेला नाही अथवा त्याबाबत दावा केला नाही. तपास अधिकारी यांचे खुलासावरुन सदर वाहन तपासाकामी आवश्यक असल्याचे दिसून येत नाही. मुळ मालक बापुसाहेब दत्तात्रय शेलार यांनी देखिल सदर वाहन अर्जदारास विक्री केली असुन परत देण्यास हरकत नसल्याचे निशाणी १३ वर कथन केले आहे. उपरोक्त वाहन हे पोलिस स्टेशनमध्ये उघडयावर ठेवलेले असल्यामुळे त्याचे नुकसान होण्याची व जर अर्जदाराला सदर वाहन सुपुर्दनाम्यावर न दिल्यास त्याची अपरिमीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मी या मतापर्यंत आले आहे की, काही अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्जदारास सदर वाहन सुपुर्दनाम्यावर परत देण्याचा आदेश पारित करणे न्यायोचित राहील. वरील कारणांकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज खालील अटी व शर्तीसह मंजुर करण्यात येतो. |
| २. | जप्त महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर व जुनी ट्रॉली लाल रंगाचा असुन त्याचा आर.टी.ओ. पासिंग नंबर MH–17–AV–9184 चेसीज नंबर NKTB11380 व इंजिन नंबर NKTB11380 हा रक्कम रुपये १०,००,०००/– (रुपये दहा लाख मात्र) च्या सुपुर्दनाम्याच्या बंधपत्रावर अर्जदारास देण्यात यावी. |
| ३. | अर्जदाराने सदर मामल्याच्या अंतीम निकालापर्यंत सुपुर्दनाम्यावर दिलेल्या सदर वाहनाच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारे बदल करु नये तसेच विक्री करु नये किंवा अन्य मार्गाने तिची विल्हेवाट लावू नये. |

| | |
|---|---|
| ४. | उपरोक्त जप्त वाहन हे न्यायालयाने किंवा चौकशी अधिका–याने आदेशीत केल्यास वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशी दरम्यान, मामल्याच्या सुनावणी दरम्यान व अंतिम निकालापर्यंत न्यायालयात हजर करावे. |
| ५. | संबंधीत चौकशी अधिका–याने सदरची जप्त वाहन हे अर्जदाराला सुपुर्दनाम्यावर देण्यापूर्वी अर्जदाराच्या खर्चाने वाहनाचे चारही बाजुंनी त्यांचे रंगीत छायाचित्र काढावे व सविस्तर पंचनामा करावा तसेच वाहनाच्या छायाचित्रासहीत छायांकित प्रती अर्जदाराकडून घ्याव्या. |
| ६. | तपासी अधिकारी यांनी सदर प्रकरणातील सर्व कागदपत्रे गुन्हा क्र.I–६२३/२०२५ बाबत दाखल दोषारोपपत्रासोबत ठेवण्यात यावे. |
| ७. | पोलिस स्टेशन अधिकारी, नेवासा यांना आदेश कळविण्यात यावा. |

ASHATAI NARAYAN SARAK

Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.03.24 18:05:48 +0530

दिनांकः २४/०३/२०२६. **( ए. एन सरक)**

ठिकाणः नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.३,

नेवासा.